आकाशवाणी पुणे

प्रादेशिक वृत्तविभाग

राष्ट्रीय बातमीपत्र

सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः25.09.2025 वारः गुरुवार

---

**ठळक बातम्या**

1) देशाच्या जहाजबांधणी आणि समुद्रमार्गे व्यापार क्षेत्रातल्या ९५ हजार कोटी रुपयांच्या ६ प्रस्तावांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचं उद्घाटन

4) महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पावसामुळे शेतीचं नुकसान, सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

5) ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉक्टर एस. एल. भैरप्पा यांचं निधन

आणि

6) आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत बांग्लादेशला पराभूत करत भारताचा अंतिम फेरीत प्रवेश

आता सविस्तर बातम्या

मंत्रिमंडळ निर्णय

देशाच्या जहाजबांधणी आणि समुद्रमार्गे व्यापार क्षेत्रातल्या, सुमारे ९५ हजार कोटी रुपयांच्या ६ प्रस्तावांना केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. रेल्वे कर्मचाऱ्यांना उत्पादकतेवर आधारित ७८ दिवसांचा बोनस देण्यासाठी एक हजार ८६५ कोटी रुपयांचा प्रस्ताव या बैठकीत मंजूर झाला. याचा लाभ सुमारे १० लाख ९१ हजार रेल्वे कर्मचाऱ्यांना होईल. क्षमता वाढ आणि मनुष्यबळ विकासासाठी १५व्या वित्त आयोगाच्या कालावधीकरिता, २ हजार २७७ कोटी रुपये तरतुदीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. तसंच वैद्यकीय शिक्षणासाठी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी क्षमता वाढवण्यालाही सरकारने मान्यता दिली. यामुळे एमबीबीएसच्या ५ हजार २३ तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५ हजार जागा वाढतील.

## पंतप्रधान दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेश आणि राजस्थानचा दौरा करणार आहेत. ग्रेटर नॉयडामध्ये, उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा-2025 चं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. या मेळाव्यात राज्याच्या विविध हस्तकला परंपरा, आधुनिक उद्योग, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग तसंच उदयोन्मुख उद्योजक एकाच व्यासपीठावर एकत्र येणार आहेत. 29 तारखेपर्यंत चालणाऱ्या या मेळाव्यात ,उत्तर प्रदेशची समृद्ध कला, संस्कृती आणि खाद्य संस्कृती यातल्या वैविध्याचंही  प्रदर्शन होणार आहे. त्यानंतर पंतप्रधान राजस्थान मध्ये एक लाख 22 हजार 100 कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन करणार आहेत. 19 हजार 210 कोटी रुपये खर्चाच्या हरित ऊर्जा प्रकल्पांचं  उद्घाटन आणि फलोदी,

जैसलमेर, जालोर आणि सीकर इथं सौर प्रकल्पांचं  उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**मुख्यमंत्री पाहणी कृषिमंत्री**

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ढगफुटी-सदृश पाऊस झाल्यानं नद्यांना पूर आला आहे. मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचं हातातोंडाशी आलेलं पीक पाण्यात गेलं आहे. या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असून, सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. तसंच दिवाळीपूर्वीच ही मदत शेतकऱ्यांना वितरित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. सोलापूर सह, लातूर जिल्ह्यातल्या औसा तालुक्यातील उजनी आणि निलंगा तालुक्यातल्या औराद शहाजानी इथं अतिवृष्टी आणि पुरामुळं झालेल्या नुकसानाची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते.
औसा तालुक्यात उजनी इथं वार्ताहरांशी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले...
**(बाईट-मुख्यमंत्री-40 सेकंद)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिव जिल्ह्यातील साडेसांगवी गावाला भेट देऊन पाहणी केली तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागाचा आढावा घेतला. यावेळी शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली.

एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही असं आश्वासन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जालना आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील

हानीग्रस्त शेतीची पाहणी केल्यानंतर दिलं. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यातील तसंच माजी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी बीड जिल्ह्यातल्या चौसाळा इथं अतीवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करतेवेळी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

**राणे मत्स्य शेती**

अतिवृष्टीमुळं मत्स्य शेतकऱ्यांचंही नुकसान झालं असून, त्यांच्या नुकसानाचे पंचनामे तातडीनं पूर्ण करून त्याचा अहवाल येत्या १० दिवसात सादर करण्याचे  आदेश  मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी काल मंत्रालयात एका बैठकीत दिले. तलावातील गाळ काढला गेला नसल्यानं मत्स्य शेतकऱ्यांचं जास्त नुकसान झालं आहे.

**कोलकाता पाऊस**

कोलकाता आणि आसपासच्या परिसरात पावसाशी संबंधित घटनांमध्ये मृतांची संख्या 11 वर पोहोचली आहे. अनेक ठिकाणी पाणी कमी झालं असलं तरी काही भाग अजूनही जलमय आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. आजही कोलकात्यात पावसाची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे. पाणी साचल्यानं, विजेचा धक्का लागून झालेल्या मृत्युबद्दल भाजपा आणि विरोधी पक्षांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर टीका केली आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे...**

**जनरल अनिल चौहान**

कॅबिनेटच्या नियुक्ती समितीनं संरक्षण प्रमुख जनरल अनिल  चौहान यांच्या सेवा विस्ताराला मंजूरी दिली आहे. ते 30 मे 2026 पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत भारत सरकारच्या सशस्त्र दलांच्या विभागाचे सचिव म्हणून कार्यरत राहतील. भारतीय सैन्यातल्या त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना परम विशिष्ट सेवा पदक, उत्तम युद्ध सेवा पदक, अती विशिष्ट सेवा पदक, सेना पदक आणि विशिष्ट सेवा पदकांनी सन्मानित करण्यात आलं आहे.

**वस्तू आणि सेवा कर**

सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी खाद्यपदार्थांवरील जीएसटी दर कमी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यामुळं अंजीर, बदाम, खजूर यासारख्या सुक्या मेव्यावरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून पाच टक्के झाला आहे. मधुमेही  रुग्णांसाठी असलेल्या विशेष खाद्यपदार्थावरील करही पाच टक्के करण्यात आला आहे. तसंच फळ आणि भाज्या यांचे दरही कमी होणार आहेत. यामुळे नागरिकांना पौष्टिक खाद्य स्वस्त दरात उपलब्ध होणार असून, निरोगी जीवनशैलीसाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

**काजीरंगा**

काजीरंगा राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र अभयारण्य उद्यापासून उघडणार असल्याची घोषणा आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांनी काल केली. सुरुवातीला उद्यानाचा बागोरी परिसर सुरू करण्यात येणार असून कोहोरा परिसर ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात तर हत्ती सफारी 1 नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.

**लिलाव पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विविध प्रसंगी मिळालेल्या भेट वस्तू आणि स्मृतीचिन्हाच्या  ऑनलाइन लिलाव होणार असून या लिलावात नागरिकांनी सहभागी व्हावं असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. या लिलावात जमा होणाऱ्या निधीचा उपयोग नमामी गंगे या उपक्रमासाठी  करण्यात येणार असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरील एक संदेशात म्हटलं आहे.

**भैरप्पा निधन**

ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉक्टर एस. एल. भैरप्पा यांचं काल बंगळुरू  इथं वृद्धापकाळानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. पाच दशकांपेक्षा अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी 25 पेक्षा जास्त कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या साहित्याचे अनेक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यांना पद्मभूषण, सरस्वती सम्मान आणि साहित्य अकादमी फेलोशिपनं सन्मानित करण्यात आलं आहे. भैरप्पा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुरमू ,पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. साहित्य अकादमीचे सदस्य नरेंद्र पाठक यांनी डॉक्टर भैरप्पा यांना श्रद्धांजली अर्पण करताना आपल्या भावना व्यक्त केल्या...

**नरेंद्र पाठक बाईट**

**क्रिकेट**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं काल बांग्लादेशचा दुबई इथं ४१ धावांनी पराभव करुन अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं २० षटकांत ६ बाद १६८ धावा केल्या. बांग्लादेश संघ सर्वबाद १२७ धावा करु शकला. ३७ चेंडूत ७५ धावा फटकवणारा अभिषेक शर्मा

सामनावीर ठरला. बांगलादेश-पाकिस्तान दरम्यान आज होणाऱ्या सामन्यात भारताविरुद्धचा अजिंक्यपदाचा प्रतिस्पर्धी ठरेल.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

**1) देशाच्या जहाजबांधणी आणि समुद्रमार्गे व्यापार क्षेत्रातल्या ९५ हजार कोटी रुपयांच्या ६ प्रस्तावांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**

**२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्याचं उद्घाटन**

**4) महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पावसामुळे शेतीचं नुकसान, सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन**

**5) ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉक्टर एस. एल. भैरप्पा यांचं निधन**

**आणि**

**6) आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत बांग्लादेशला पराभूत करत भारताचा अंतिम फेरीत प्रवेश**

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**